**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# महाराष्ट्र राज्यातील शेती उत्पादनाची सद्य:स्थिती—एक आढावा (२०१३ ते २०१५)

**संगीता साळवे, Ph. D.**

*अर्थशास्त्र विभागप्रमुख, डॉ. अरविंद तेलंग कॉलेज, निगडी, पुणे*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणविणा—या भारतात पूर्वीपासून आजतागायत शेतक—यांची दयनीय अवस्था आहे. महाराष्ट्रातील विदर्भात आणि मराठवाडयात मोठया प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहे. जो शेतकरी अन्नधान्याचे उत्पादन घेवून आपल्याला जगवतो त्या शेतकरी वर्गाची हालअपेष्ठा अजुनही चालू आहे.महात्मा फुलेंनी शेतक—यांच्या जीवनाकडे लक्ष वेधले होते. दिवसभर काबाड कष्ट करणारा, उन्हा—तान्हात घाम गाळणारा शेतकरी कायम दु:खी दिसतो. पाऊस जास्त पडला तर शेतक—यां ऐवजी इतर लोक जास्त खुष होतात कारण अन्नधान्य स्वस्त होते आणि दुष्काळ पडला तरी शेतकरीच दु:खी होतो कारण त्याला अन्नधान्य विकत घेण्यासाठी खडी फोडायला सार्वजनिक ठिकाणी जावे लागते. शेतकरी वर्ग हा आजही जागतिकीकरणाच्या अवस्थेत देशाचा कितीही विकास झाला तरी विकासाच्या पलिकडचे जीवन जगत आहे.

लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुस—या क्रमांकाचे राज्य आहे. राज्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ११.२४ कोटी असून ती देशातील एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. आधुनिक आर्थिक धोरणाच्या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगी करणाचा जास्त प्रभात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर असल्याने राज्यातील औद्योगिक व सेवा या दोन्ही क्षेत्रांचा स्थूल राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा ८८.७ टक्के तर कृषी व संलग्न क्षेत्राचा हिस्सा ११.३ टक्के आहे. महाराष्ट्रात शहरीकरण मोठया प्रमाणावर होत असल्याने ४५.२ टक्के लोकसंख्या आज नागरी भागात राहत आहे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२०१४ च्या आकडेवारीनुसार ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर वगळून) २२६ तालुक्यांत ११० तालुक्यात साधारण अपुरा पाऊस तर १७ जिल्हयात सरासरी पेक्षाही जास्त पाऊस पडला आहे म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत पाऊस कमी असल्याने पेरणीचे क्षेत्र कमी झाले आहे. परिणामी हेक्टरी उत्पादनही घटलेले दिसते.

**तक्ता क्र. १: प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| अ. क्र. | पीक | क्षेत्र (००० हेक्टर) | | | उत्पादन (००० मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१३—१४ | २०१४—१५ | शे. बदल | २०१३—१४ | २०१४—१५ | शे. बदल |
| १ | एकूण तृणधान्य | ४०५८ | ३५५८ | —१२ | ७५४४ | ५४४४२ | —२८ |
| २ | एकूण कडधान्य | २०११ | १६८८ | —१६ | १४९२ | ८९५ | —४० |
| ३ | एकूण तेलबिया | ३८९० | ४०८७ | ०५ | ४६१७ | २०९२ | (—५५) |
| ४ | कापूस | ४१६० | ४१९२ | ०१ | ८८३४ | ६६०८ | (—२५) |
| ५ | ऊस | ९३७ | १०५४ | १२ | ७६९०१ | ८४२६१ | १० |
| | एकूण | १५०५६ | १४५७९ | —३ | — | — | — |

संदर्भ: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४—१५

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, एकूण तृणधान्याचे हेक्टरी क्षेत्र घटल्याने त्याचे उत्पादनही घटले आहे. त्यामध्ये ज्वारीचे निम्म्याने क्षेत्र घटल्याने उत्पादन निम्म्यापेक्षाही जास्त दराने घटल्याने ज्वारीच्या किंमतीमध्ये वाढ झालेली दिसून येते. मका उत्पादनाला औद्योगिक व सेवा क्षेत्रातील घटकांकडून मागणी येत असल्याने मका उत्पादन क्षेत्रात वाढ झाली असली तरी उत्पादनात मात्र वाढ झाली नाही परिणामी एकूण तृणधान्याचे उत्पादन प्रमाण घटल्याने त्याचा परिणाम किंमतीत वाढ झालेली दिसते.

सातत्याने अपुरा पाऊस पडत असल्याने कोरडवाहू क्षेत्रात घेतले जाणारे कडधान्याचे उत्पादन क्षेत्र कमी झाले. १६ टक्के इतके क्षेत्र घटल्याने उत्पादन ४० टक्के घटले आहे. तूर उत्पादनात ३६ टक्के, मूग उत्पादनात ५७ टक्के घट झालेली दिसून येते. उडिद उत्पादनात ५५ टक्के घट झाल्याने कडधान्याचे देखील भाव मागील तीन वर्षांत वाढलेले दिसून येतात.

शेतक—यालाही रोखीच्या उत्पादनामध्ये तेलबियाचे उत्पादन वाढवावे असे वाटत असल्यानेच हेक्टरी पिकाखालील क्षेत्र ५ टक्के दराने वाढले परंतु हवामानातील होणारे बदल आणि अवकाळी पडणारा पाऊस यामुळे पिकाखालील हेक्टरी क्षेत्र वाढूनही उत्पादन घटलेले दिसून येते. सोयाबीनचे उत्पादन ३० टक्के घटले, भुईमूग ३४ टक्के घटले तर सर्वात जास्त सूर्यफुल ५० टक्के घटले आहे.

ज्या क्षेत्रात पाऊस मुबलक प्रमाणात पडतो त्या क्षेत्रात ऊस व कापूस या पिकांचे उत्पादन होते असे असले तरी कापसाचे उत्पादनही २०१३—१४ च्या तुलनेत २०१४—१५ या कालावधीत २५ टक्क्यांनी घटलेले आहे. फक्त ऊस उत्पादन १० टक्के दराने वाढलेले दिसते. विजेचा वापर २०१३—१४ च्या तुलनेत २०१४—१५ मध्ये कृषी क्षेत्राचा वापर २१,७२५ दशलक्ष युनिटवरुन १४४६९ दशलक्ष इतका घटलेला दिसून येतो. त्याचा परिणामही उत्पादन घटण्यावर झालेला दिसून येतो.

वरील सर्व आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, लोकसंख्या वाढत आहे परंतु शेतीतील उत्पादन मात्र दिवसें दिवस घटत जात आहे. याची अनेक कारणे सांगता येतील. त्यापैकी प्रमुख कारण म्हणजे शेतमालाला व्यापारी देवू करत असलेला कमी भाव.

शेतक—यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी आणि कृषी क्षेत्र आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी केंद्र शासन काही निवडक पिकांसाठी किमान आधारभूत किंमत जाहिर करते. काही प्रमुख पिकांच्या बाबतीत किंमत आधारभूत किंमती पुढीलप्रमाणे....

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तक्ता क्र.२: प्रमुख पिकांच्या आधारभूत किंमती**

| पीक | किमान आधारभूत किंमत (रु.क्विंटल) | |
|---|---|---|
| | २०१३—१४ | २०१४—१५ |
| तांदूळ | १३४५ | १३६० |
| ज्वारी—संकरित | १५०० | १५३० |
| मालदांडी | १५२० | १५५० |
| मका | १३१० | १३१० |
| तूर | ४३०० | ४३५० |
| मूग | ४५०० | ४६०० |
| सूर्यफुल | ३७०० | ३७५० |
| भूईमुग | ४००० | ४००० |
| करडई | १८०० | ३०५० |
| तीळ | ४५०० | ४५०० |

संदर्भ: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४—१५

शेतक—यांना शासनाकडून विविध बॅका तसेच सहकारी संस्थामार्फत अल्पमुदतीची पीक कर्जे दिली जातात. त्यामध्ये व्यापारी बॅका आणि भूविकास बॅकांकडून कर्जे देण्याचे प्रमाण जास्त आहे.

२०१२—१३ च्या तुलनेत २०१३—१४ मध्ये राष्ट्रीय कृषी विमा योजने अंतर्गत या योजनेचा फायदा घेणा—या शेतक—यांची संख्या २३.१८ लाख वरुन १७.४१ लाख पर्यंत घटलेली दिसते. महाराष्ट्रातील शेतकरी जनता अपघात विमा योजनेद्वारे २००९—२०१० मध्ये २१.०७ कोटी रुपये नुकसान भरपाई शेतक—यांना दिली होती. २०१३—१४ मध्ये ही नुकसान भरपाई ११.५४ कोटी रुपये दिलेली आहे. म्हणजेच नुकसान भरपाईचे वाटप निम्म्याने झाल्याने शेतक—यांना आज अनेक संकंटांना सामोरे जात असल्याचे दिसून येते.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

वरील सर्व विश्लेषणावरुन असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रात शेतीला प्रमुख व्यवसाय समजला जात असला तरी शेतक—यांच्या उत्पन्न वाढीसाठी निसर्ग आणि सरकार दोघांची योग्य रितीने साथ मिळत नसल्याने दिवसेंदिस शेतीतील उत्पादन घटीची अवस्था चालूच आहे. हे देशाच्या भावी आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने हानीकारक ठरणार आहे. म्हणून सरकारने आणि आपण सर्वांनी शेतकरी उत्पादन वाढीसाठी पुढील उपायांकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

१. शेतक—यांच्या मालाची आधार किंमती भाववाढीच्या तुलनेत वाढत्या असाव्यात.
२. शेतक—यांना बि—बियाणे, यंत्रसामग्रीसाठी कर्जपुरवठा विकसित देशांसारखा कमी व्याजदराने करावा.
३. शेतक—यांच्या मुलांना मोफत शिक्षण व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावेत.
४. जलसिचंनाखालील क्षेत्रात वाढ घडवून आणावी.
५. कोरडवाहू शेतीतील धोके कमी करण्यासाठी व्यापक कार्यक्रम हाती घ्यावेत.
६. सीमांत शेतक—यांनी सहकारी पध्दतीने शेतीचा उपयोग करुन जास्तीत जास्त जमिन उत्पादकतेसाठी वापरावी.
७. ०१ जानेवारी २०१४ पासून महाराष्ट्र सरकारने कोरडवाहू शेती अभियान सुरु केले आहे. ते यशस्वी करण्यासाठी सरकार बरोबर शेतक—यांनी, सर्वसामान्य नागरिकांनी हातभार लावावा.

**संदर्भसुची**

*यशमंथन, एप्रिल—जून २०१०*

*महाराष्ट्र शासन, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी—२०१४—१५*

*Maharashtra Development Report, 2014-15*

*अर्थसंवाद, एप्रिल—जुन २०१४, खंड ३८, अंक १*

*भारतीय अर्थव्यवस्था, दत्त सुंदरम २०१३*

*Government of India, Ministry of Finance, 2013*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*